


RNI NO-MAHMAR/2022/90217

दैनिक निडर निर्भिड
# जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

Email- jansanchlan@gmail.com
संपादक : जितेंद्र कायस्थ
Mob- 9822720784




वर्ष ३ रे अंक : ३४ वा बुधवार दि. ०५ मार्च २०२५ पृष्ठ ८ किंमत ३ रुपये

# कडक भूमिका घ्या, दिल्लीश्वरांकडून फडणवीसांना सूचना, धनंजय मुंडे यांचा राजीनामा घेण्यामागील गोष्ट समोर...

वृत्तसंस्था/मुंबई

बीडमधील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्याप्रकरणावरून गेले काही महिने वादाच्या भोवऱ्यात सापडलेले राज्याचे अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षणमंत्री धनंजय मुंडे यांनी मंगळवारी अखेर अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या दुसऱ्याच दिवशी आपल्या मंत्रिपदाचा राजीनामा दिला. देशमुख हत्या प्रकरणात मुंडे यांचे निकटवर्तीय वाल्मिक कराड याचा सहभाग निश्चित झाल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यांच्या राजीनाम्यासाठी आग्रही भूमिका घेतली होती. तरीही ताठर भूमिका स्वीकारणाऱ्या मुंडे यांना, राजीनामा न दिल्यास कारवाई करावी लागेल, असा अंतिम इशारा मुख्यमंत्र्यांनी दिल्यानंतरच मुंडे यांना पायउतार होणे भाग पडले. मुंडे सोमवारी दुपारी भेटीसाठी आले असता मुख्यमंत्री फडणवीस यांनी त्यांना राजीनामा न दिल्यास कारवाई करावी लागेल, असे स्पष्ट केले. त्यानंतर रात्री देशमुख हत्याप्रकरणात पोलिसांनी दाखल केलेल्या आरोपपत्रातील काही छायाचित्रे सर्वत्र प्रसिद्ध झाली. ही छायाचित्रे नागरिकांचे मन विषण्ण करणारी असल्याने यातून राज्य सरकारची प्रतिमा डागाळली जाणार, या जाणिवेतून रात्री उशिरा सरकारदरबारी वेगाने घडामोडी घडल्या.या प्रकरणात कडक भूमिका घेण्याबाबत भाजपच्या दिल्लीतील शीर्षस्थ नेतृत्वाकडूनही सूचना आल्याचे समजते. त्यानंतर मुख्यमंत्री फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यात चर्चा झाली. मुंडे आता राजीनामा देणार नसतील तर त्यांच्याविरोधात कारवाई करावी लागेल, अशीच स्पष्ट भूमिका यावेळी फडणवीस यांनी घेतल्याचे समजते. यानंतर फडणवीस यांनी मुंडे यांच्याशीही संवाद साधला. मंत्रिपदाचा राजीनामा न दिल्यास राज्यपालांना पत्र पाठवून कारवाई करण्यात येईल, असा निर्वाणीचा इशारा दिला व राजीनाम्यासाठी मंगळवार सकाळपर्यंतची मुदत दिली. मुख्यमंत्री प्रचंड आग्रही असल्याचे पाहून मंगळवारी मुंडे यांना अखेर राजीनामा द्यावाच लागला.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी धनंजय मुंडे यांचा राजीनामा स्वीकारत तो राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांच्याकडे पाठवला. राज्यपालांनीही मुंडे यांचा राजीनामा मंजूर केला. धनंजय मुंडे यांनी माझ्याकडे राजीनामा दिला आहे. त्यांचा राजीनामा मी स्वीकारला असून, पुढील कार्यवाहीसाठी राज्यपालांकडे पाठवला आहे. मुंडे यांना मंत्रिपदावरून मुक्त करण्यात आले आहे, अशी माहिती मुख्यमंत्री फडणवीस यांनी माध्यमांना दिली.देशमुख हत्या प्रकरणातील आरोपी वाल्मिक कराड हा मंत्री धनंजय मुंडे यांचा निकटवर्तीय असल्याच्या आरोपावरून गेले दोन महिने विरोधकांनी मुंडे यांच्या राजीनाम्याची मागणी उचलून धरली होती. मात्र यासंदर्भात सीआयडी तपास करीत असून, त्यांचा अहवाल आला की कारवाई केली जाईल, अशा प्रतिक्रिया मुख्यमंत्री फडणवीस तसेच उपमुख्यमंत्री अजित पवार



यांच्याकडून प्रसारमाध्यमांना देण्यात येत होत्या. मध्यंतरीच्या काळात कराड तसेच इतर आरोपींतील संभाषण तसेच आरोपींचे काही व्हिडीओ प्रसारमाध्यमांमध्ये झळकत होते. याशिवाय आमदार सुरेश धस यांच्याकडून सातत्याने धनंजय मुंडे तसेच या प्रकरणातील आरोपी यांच्यात कसे लागेबांधे आहेत, याचे कथन केले जात होते. मुंडे यांच्या राजीनाम्याबाबतचा दबाव वाढला होता.विरोधकांना शांत करण्यासाठी या प्रकरणाच्या तपासाचा सोक्षमोक्ष लागेपर्यंत मुंडे यांनी राजीनामा द्यावा, अशी भूमिका फडणवीस तसेच पवार या दोन्ही नेत्यांनी घेतल्याचे समजते. मुंडे मात्र राजीनामा न देण्याच्या भूमिकेवर ठाम होते. त्यांना याबाबत अजित पवार यांनीही समजावण्याचा प्रयत्न केला. पवार यांनी, आपण स्वतः व छगन भुजबळ यांनी नैतिकतेच्या मुद्द्यावर राजीनामा दिला होता, याची आठवण करून देत मुंडे ताठर भूमिकेत असल्याचे स्पष्ट केले होते.

# इरला खून प्रकरणी 14 जणांचे जबाब!...

## हर्षवर्धन सपकाळ यांनी कारवाईची केली होती मागणी!

जनसंचलन/बुलढाणा

गेल्या महिन्यात कथितरीत्या रेतीच्या अवैध उत्खनन आणि वाहतूक प्रकरणात उमेश फदाट नामक व्यक्तीचा ईरला गावानजीक खून झाला होता. याप्रकरणात सध्या पोलिस तपास करत असून, आतापर्यंत १४ जणांचे जबाब नोंदविले आहेत. दरम्यान, ३ मार्च रोजी दोन टिप्पर चालकांचीही चौकशी करण्यात आल्याची माहिती आहे. मराठवाडा आणि विदर्भाच्या सीमेवरील हे प्रकरण संवेदनशील बनले आहे. इरला खून प्रकरणी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी या अवैध रेती प्रकरणाची कसून चौकशी पोलिस प्रशासनाने त्वरीत करावी, अशी मागणी केली होती.शिवाय मराठवाडा व विदर्भ या सीमेवर अवैध रेती वाहतूक, उपसा प्रकरणातून या खून,आत्महत्या च्या घटनेचा उलगडा करून आका व त्याचे ङ्कङ्कनातेवाईकङ्कङ्क कोण? यांचेवरही कारवाई व्हावी अशी



मागणी, मृतकाच्या नातेवाईकाने कळकळीने पोलिसांकडे केलेली आहे.

# किरकोळ वादातून शेलोडी येथे चाकूहल्ला

जनसंचलन/ खामगाव

क्षुल्लक वादाचे पर्यावसान हाणामारीत झाल्याची घटना खामगाव तालुक्यातील शेलोडी येथे सोमवारी रात्री ९:३० वाजता घडली. यामध्ये एका वृद्धावर चाकूने हल्ला करून त्याच्या मुलालाही गंभीर जखमी करण्यात आले. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी मनोहर विश्वनाथ गाडे (३७) यांचे काका रघुनाथ हरिश्चंद्र गाडे आणि आरोपी पवन दशरथ बानाईत यांच्यात वाद झाला होता. त्यावेळी आरोपीने धमकी



दिली होती. सोमवारी रात्री दशरथ बानाईत, मनोरमा बानाईत आणि मोहन बानाईत यांनी रघुनाथ गाडे, त्यांचा मुलगा गोपाल गाडे व रघुनाथ गाडे या दोघांवर चाकूने वार केला. याप्रकरणी पवन दशरथ बानाईत, मनोरमा दशरथ बानाईत, दशरथ आत्माराम बानाईत आणि मोहन दशरथ बानाईत (सर्व रा. शेलोडी, ता. खामगाव) यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# ममत्वाचा अथांग महासागर- सिंधुताई सपकाळ!

## संपादकीय लेख

सिंधुताई सपकाळ या भारतीय सामाजिक कार्यकर्त्या होत्या. त्या विशेषतः भारतातील अनाथ मुलांचे संगोपन करण्याच्या कार्यासाठी ओळखल्या जातात. त्यांना नुकताच २०२१मध्ये सामाजिक कार्य श्रेणीत पद्मश्री पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. त्या वेळोंवेळी अनेक गौरवांच्या मानकरी ठरल्या. सिंधुताईंना सुमारे ७५० राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पुरस्कार मिळाले आहेत. त्यांतील पद्मश्री पुरस्कार, महाराष्ट्र शासनाचा डॉ.बाबासाहेब आंबेडकर समाज भूषण पुरस्कार, पुण्याच्या अभियांत्रिकी कॉलेजचा कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग पुरस्कार, महाराष्ट्र शासनाचा अहिल्याबाई होळकर पुरस्कार, मूर्तिमंत आईसाठीचा राष्ट्रीय पुरस्कार, आयटी प्रॉफिट ऑर्गनायझेशनचा दत्तक माता पुरस्कार, सोलापूरचा डॉ.निर्मलकुमार फडकुले स्मृती पुरस्कार,राजाई पुरस्कार, शिवलीला महिला गौरव पुरस्कार, श्रीरामपूर अहमदगर जिल्हा येथील सुनीता कलानिकेतन न्यासातर्फे कै.सुनीता त्र्यंबक कुलकर्णी यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ दिला जाणारा सामाजिक सहयोगी पुरस्कार, सीएनएन- आयबीएन आणि रिलायन्स फाउंडेशनने दिलेला रिअल हीरो पुरस्कार, दैनिक लोकसत्ताचा सह्याद्रीची हिरकणी पुरस्कार, प्राचार्य शिवाजीराव भोसले स्मृती पुरस्कार, डॉ.राम मनोहर त्रिपाठी पुरस्कार, पुणे विद्यापीठाचा जीवन गौरव पुरस्कार आदींचा समावेश आहे.

सिंधुताईंचा जन्म आणि त्यांचे सुरवातीचे जीवन खडतर होते. त्यांचा जन्म दि.१४ नोव्हेंबर १९४७ रोजी वर्धा जिल्ह्यातील पिंप्री मेघे गावात आणि ब्रिटीश भारतातील बेरार येथील अभिमन्यू साठे या गुराख्याच्या घरी झाला. एक अवांछित मूल असल्याने त्यांचे नाव चिंधी- फाटलेल्या कापडाचा तुकडा ठेवले. पण हीच चिंधी अनेक फाटक्या ठिगळांना जोडते, याचा त्यावेळी कोणी विचारही केला नसेल. अत्यंत गरिबी, कौटुंबिक जबाबदाऱ्या आणि लवकर लग्न यामुळे त्यांना चौथी इयत्ता उत्तीर्ण झाल्यानंतर शाळा सोडावी लागली. त्यांचे वयाच्या बाराव्या वर्षी श्रीहरी सपकाळ यांच्याशी लग्न झाले, जे त्यांच्यापेक्षा तब्बल वीस वर्षांनी मोठे होते. लग्नानंतर त्या वर्ध्यातील सेलू येथील नवरगाव गावात गेल्या. घरी प्रचंड सासुरवास होता. कुटुंबात शैक्षणिक वातावरण नाही. जंगलात लाकूडफाटा, शेण गोळा करताना सापडलेले कागदाचे तुकडे माई घरी आणायच्या आणि उंदराच्या बिळांत लपवून ठेवायच्या. क्वचित घरी एकट्या असल्या तर त्या अभ्यास करण्याचा प्रयत्न करीत. अठराव्या वर्षापर्यंत माईंची तीन बाळंतपणे झाली. त्या चौथ्या वेळी गर्भवती असताना त्यांनी त्यांच्या आयुष्यातला पहिला संघर्ष केला. तेव्हा गुरे वळणे, हाच व्यवसाय असायचा. गुरेही शेकड्यांनी असायची. त्यांचे शेण काढता काढता बायकांचे कंबरडे मोडायचे. शेण काढून बाया अर्धमेल्या व्हायच्या. पण त्याबद्दल कोणतीही मजुरी मिळायची नाही. रस्त्यावर मुरूम फोडणाऱ्यांना मजुरी, पण शेण काढणाऱ्यांना नाही. या शेणाचा लिलाव फॉरेस्टवाले करायचे. इथे सिंधुताईंनी बंड पुकारले आणि लढा सुरू केला. त्यामुळे या लिलावात ज्यांना हप्ता मिळायचा त्यांच्या हप्त्यावर गदा आली. हा लढा जिंकल्या पण त्यांना या लढ्याची जबर किंमत चुकवावी लागली. ताईंच्या या धैर्याने गावातील जमीनदार, दमडाजी असतकर दुखावला गेला होता. जंगलखात्याकडून येणारी मिळकत बंद झाली. दमडाजीने सिंधुताईंच्या पोटातील मूल आपले असल्याचा प्रचार सुरू केला. नवऱ्याच्या मनात त्यांच्या चारित्र्याबद्दल संशय निर्माण झाला आणि पूर्ण दिवस भरलेल्या ताईंना त्याने बेदम मारून घराबाहेर काढले. गुरांच्या लाथा बसून मरतील म्हणून तशा अर्धमेल्या अवस्थेत त्यांना गोठ्यात आणून टाकले. त्या अवस्थेत त्यांना कन्या जन्माला आली. नवऱ्याने हाकलल्यानंतर गावकऱ्यांनीही हाकलले. हे लग्न फार काळ टिकले नाही आणि वयाच्या वीसव्या वर्षीच त्यांना त्यांच्या मुलीसोबत नवऱ्याने सोडून दिले.

माराने अर्धमेल्या झालेल्या सिंधुताई माहेरी आल्या, पण सख्ख्या आईनेही पाठ फिरवली. परभणी, नांदेड, मनमाड रेल्वे स्टेशनांवर त्या भीक मागत हिंडायच्या. चतकोर भाकर, उष्टावलेले एखादे फळ हाती लागेल, म्हणून रात्रभर रेल्वे रुळांच्या कडेने फिरायच्या. एकदा जळगाव जिल्ह्यातील पिंपराळा स्टेशनवर त्यांनी आत्महत्येचा प्रयत्नही केला. पण लहान मुलीचा जीव घेतला तर पाप लागेल म्हणून मागे फिरल्या. मग पुन्हा भीक मागत पोट भरणे सुरू झाले. त्या दिवसभर भीक मागायच्या आणि रात्री स्टेशनवरच झोपायच्या. परंतु तेथे त्यांनी कधी एकटे खाल्ले नाही. स्टेशनवरच्या सगळ्या भिकाऱ्यांना बोलावून त्या मिळालेल्या अन्नाचा काला करायच्या आणि मग सर्व भिकारी एकत्र बसून जेवायचे. त्यांनी २१ वर्षांच्या ताईंना संरक्षण दिले. दोन दिवस काहीच भीक मिळाली नसल्याचे त्यांच्या लक्षात आले. त्यांना तेथे कायम राहता येणार नाही. म्हणून शेवटी सिंधुताईंनी स्मशान गाठले.

अनाथ मुलांना सांभाळून त्यांच्या जीवनाला दिशा देण्यासाठी सिंधुताई यांनी ममता बाल सदन संस्थेची स्थापना केली. सन १९९४ साली पुण्याजवळ पुरंदर तालुक्यात कुंभारवळण या गावात ही संस्था सुरू झाली. आपली कन्या ममता हिला दगडूशेठ हलवाई संस्थेच्या माध्यमातून शिक्षणासाठी सेवासदन येथे दाखल केले आणि त्यांनी इतर अनाथ आणि बेवारस मुलांना आधार दिला. तेथे लहान मुलांना सर्व शिक्षण दिले जाऊ लागले. त्यांच्या भोजन, कपडे अन्य सुविधा यांची उपलब्धता संस्थेकडून केली जात असे. शिक्षण पूर्ण झाल्यावर येथील मुले आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी होतील यासाठीही त्यांना मार्गदर्शन दिले जाते. आर्थिक दृष्ट्या स्वयंपूर्ण झाल्यावर या युवक युवतींना योग्य जोडीदार शोधून देणे आणि त्यांच्या विवाहाचे आयोजन करणे हे कार्यही संस्थेकडूनच केले जाते. अशी सुमारे १०५० मुले या संस्थेत राहिलेली आहेत. त्यांनी अन्य समकक्ष संस्थाही स्थापन केलेल्या आहेत त्या अशा- बाल निकेतन हडपसर, पुणे. सावित्रीबाई फुले मुलींचे वसतिगृह, चिखलदरा. अभिमान बाल भवन, वर्धा. गोपिका गाईरक्षण केंद्र, वर्धा. ममता बाल सदन, सासवड. सप्तसिंधु महिला आधार बालसंगोपन व शिक्षणसंस्था, पुणे. आंतरराष्ट्रीय पातळीवर त्यांनी आपल्या संस्थेच्या प्रचारासाठी आणि कार्यासाठी निधी संकलन करण्याच्या हेतूने प्रदेशदौरे केले आहेत. आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर त्यांनी आपल्या बोलण्याने आणि काव्याने समाजाला प्रभावित केले आहे. परदेशी अनुदान मिळणे सोपे जावे या हेतूने त्यांनी मदर ग्लोबल फाउंडेशन संस्थेची स्थापना केली आहे. त्यांना महानुभाव पंथाचा अनुग्रह होता. महानुभाव पंथाच्या नियमाप्रमाणे त्यांना भुमीडाग देण्यात आला.

अशातच सिंधुताईंवर दि.२५ नोव्हेंबर २०२१ रोजी हॉस्पिटलमध्ये डायफ्रामॅटिक हर्नियाची शस्त्रक्रिया झाली. त्यांच्यावर शस्त्रक्रियोत्तर काळजी घेण्यात येत होती. पाच वर्षांहून अधिक काळ ग्रस्त असलेल्या डायफ्रामॅटिक हर्नियामुळे त्यांचे डाव्या बाजुचे फुफ्फुस व्यवस्थितरित्या कार्य करीत नव्हते. शस्त्रक्रियेनंतर त्यांची प्रकृती थोडी बरी झाली होती. तथापि, पाच दिवसांपूर्वी त्यांना फुफ्फुसाचा संसर्ग वाढल्यानंतर त्यांची प्रकृती बिघडू लागली, त्यामुळे त्यांना व्हेंटिलेटर सपोर्टवर ठेवण्यात आले होते. दरम्यान त्यांना हृदयविकाराचा तीव्र झटका आला आणि दि.०४ जानेवारी २०२२ रोजी सायंकाळी ८ वाजून १० मिनीटांनी त्यांचे निधन झाले. पुणे येथील गॅलक्सी केर या दवाखान्यामध्ये त्यांनी अखेरचा श्वास घेतला.

# जिल्हा रुग्णालयात जागतिक श्रवण दिन साजरा...

**जनसंचलन/ बुलढाणा**

जागतिक आरोग्य संघटनेमार्फत दि. ३ मार्च हा दिवस जागतिक श्रवण दिवस म्हणून साजरा केला जातो. त्याअनुषंगाने जिल्हा रुग्णालयात जागतिक श्रवण दिन साजरा करण्यात आला. यावेळी वैद्यकीय अधिकारी यांनी श्रवण आजार व निदानाच्या विविध पद्धतीबाबत मार्गदर्शन केले. श्रवण व श्रवण संबंधी उद्भवणाऱ्या विविध आजारांबाबत जनजागृती निर्माण व्हावी व प्राथमिक अवस्थेत श्रवणव्याधींचे निदान होवून योग्य वेळी उपचार व्हावे हा त्यामागचा प्रमुख हेतू आहे. यावर्षी जागतिक आरोग्य संघटनेद्वारे ङ्गङ्घ - मफह्या थीमसह जागतिक श्रवण दिवस साजरा करण्याचे आवाहन करण्यात आलेले आहे. या थीमनुसार जिल्हास्तरीय कार्यक्रम जिल्हा रुग्णालय येथे पार पडला. यावेळी जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. भागवत भुसारी, अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक विश्वास खर्चे, जिल्हा स्त्री रुग्णालयाचे अधीक्षक तथा जेष्ठ कान नाक घसा तज्ञ डॉ. प्रशांत पाटील तसेच मुख्य अधिपरिचारिका, जिल्हा परिचार्या, प्रशिक्षण केंद्राच्या प्राचार्या, प्राध्यापक व विद्यार्थिनी उपस्थित होते.

श्रवण तज्ञ डॉ. सोनुने ह्यांनी राष्ट्रीय असंसर्गजन्य रोग नियंत्रण कार्यक्रमाअंतर्गत जिल्हा स्तरावर सुरु असलेल्या राष्ट्रीय कर्णबधिरता प्रतिबंध व नियंत्रण कार्यक्रमांतर्गत पुरविण्यात येणाऱ्या सेवांबाबत विस्तृत प्रस्तावना उपस्थितांना विषद केली. जिल्हा स्त्री रुग्णालयाचे अधीक्षक डॉ.प्रशांत पाटील यांनी श्रवण आजारांबाबत प्राथमिक अवस्थेत निदानाच्या विविध पद्धतीचा उपयोग शासकीय यंत्रणेत कसा करावा या बाबत उपस्थितांना मार्गदर्शन केले. तसेच अध्यक्षीय भाषणात जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. भुसारी यांनी जागतिक आरोग्य संघटनेच्या थीमनुसार जिल्ह्यातील विविध आरोग्य संस्थांमार्फत पुरविण्यात येणाऱ्या सेवा अधिक प्रभावीपणे कशाप्रकारे पुरविण्यात येतील याबाबत उपस्थितांना मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राष्ट्रीय असंसर्गजन्य रोग नियंत्रण कार्यक्रमाचे प्रभारी जिल्हा कार्यक्रम समन्वयक डॉ. पंकज राठोड ह्यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी जिल्हा रुग्णालयातील डी.ई.आय.सी. विभागातील




भाषा व श्रवण तज्ञ डॉ. प्रियंका राठोड, कान नाक घसा विभागातील अधिकारी भक्तराज मानतकर, स्वप्नील वायाळ ह्यांनी नियोजन केले. कार्यक्रमाच्या शेवटी डी.ई.आय.सी. विभागातील मनोविकार चिकित्सक सिध्दार्थ जाधव ह्यांनी उपस्थितांचे आभार व्यक्त केले.

*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue Court.* 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

# मुख्यमंत्र्यांचे हात कुणी बांधत आहेत का?

## उद्धव ठाकरेंचा सवाल, महायुतीबद्दल मोठा दावा...

**मुंबई :** मंत्री धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्यानंतर महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी आज विधान भवनात माध्यमांना प्रतिक्रिया दिली. धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्याबाबत महाविकास आघाडीच्या तीनही पक्षांच्या आमदारांनी बोलून झाले आहेत. प्रश्न एवढाच पडला आहे की, काल जे फोटो आले ते आधी सरकारकडे आले होते की नव्हते? हा महत्त्वाचा प्रश्न आहे. त्या निमित्ताने सुद्धा बरीचशी चर्चा झाली. राजीनाम्याचा आजचा हा पहिला दिवस झालेला आहे. रोजच काही ना काही भानगडी बाहेर येत आहेत. मला असं वाटतं की मुख्यमंत्री पारदर्शी कारभार करत असतील तर त्यांचं स्वागत आहे. पण पारदर्शीपणाने काम करत असताना त्यांचे हात कुणी बांधत आहे का? हा सुद्धा एक प्रश्न आहे, असं मोठं वक्तव्य उद्धव ठाकरे यांनी केलं आहे. महाराष्ट्राच्या जनतेला या सर्व गोष्टींचा कंटाळा आलेला आहे. त्यांना त्यांच्या व्यथा सोडवणारं सरकार पाहिजे. एकमेकांच्या व्यथांना पांघरुन घालणारं सरकार हे महाराष्ट्राच्या जनतेला नकोय. आमची सुद्धा हीच अपेक्षा आहे. विरोधी पक्ष म्हणून आम्ही कुणाच्या विरोधात आहोत तर आम्ही समस्येच्या विरोधात आहोत.





चांगलं राज्य घडवण्यासाठी सर्वांनी आपापल्या जबाबदाऱ्या पार पाडल्या पाहिजेत, असं उद्धव ठाकरे म्हणाले.आपला प्रश्न अतिशय योग्य आहे की, डिसेंबर महिन्यापासून ही घटना गाजत आहे. धनंजय मुंडे यांनी जो राजीनामा दिला आहे, त्यांनी स्वत: त्यांच्या तब्येतीचं कारण दिलं आहे. मी त्यांच्या तब्येतीबद्दल कोणतंहील भाषण करु इच्छित नाही. कारण कुणीही कुणाच्या प्रकृतीबद्दल आणि प्रकृती अस्वस्थाबद्दल चेष्टा करु नये कारण आमच्यातले जे कुणी तिकडे गेले होते त्यांनी माझ्या प्रकृतीची चेष्टा केली होती. पण मी एक संस्कार पाळणारा आहे. त्यामुळे कुणाच्या तब्येतीबद्दल किंवा प्रकृती स्वास्थ्याबद्दल अजिबात चेष्टा करणार नाही, असं उद्धव ठाकरेंनी स्पष्ट केलं.मात्र नेमकं खरं कारण काय? कारण धनंजय मुंडे यांनी सांगितलं आहे की, त्यांनी त्यांच्या प्रकृती अस्वास्थाबद्दल राजीनामा दिला आहे. तर उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सांगितलं की, मुंडेंनी नैतिकतेच्या आधारावर राजीनामा दिला. नेमकं कारण काय? त्यांनी प्रकृती अस्वस्थाबद्दल राजीनामा दिला असेल तर एवढे फोटो समोर आल्यानंतरही त्यांचा राजीनामा का घेतला गेला नाही याचं उत्तर सरकारने दिलं पाहिजे, अशी मागणी उद्धव ठाकरेंनी केली.

या सगळ्या गोष्टी नेमक्या अधिवेशन काळातच बाहेर कशा आल्या आणि दोन एक महिने त्या होत्या तर बाहेर का आल्या नाहीत, या गोष्टी सरकारपर्यंत पोहोचल्या असतील तर त्याचवेळी त्यांचा राजीनामा का घेतला गेला नाही? हा प्रश्न आहे. या अशा घटनांमुळे सरकारपेक्षा महाराष्ट्र जास्त बदनाम होत आहे. महाराष्ट्राची बदनामी कोणत्याही परिस्थितीत होता कामा नये असं प्रत्येक नागरिकाचं म्हणणं आहे, असं उद्धव ठाकरे म्हणाले.

# विरोधी पक्षनेतेपदासाठी अडीच-अडीच वर्षांचा फॉर्म्युला?




**मुंबई :** विधान भवनात विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांच्या दालनात महाविकास आघाडीची महत्त्वाची बैठक पार पडली. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे हे स्वत: या बैठकीला उपस्थित होते. या बैठकीत विधानसभेचे विरोधी पक्षनेतेपदी कुणाची नियुक्ती करावी, याबाबत चर्चा झाली. ठाकरे गटाकडून भास्कर जाधव यांच्या नावावर शिक्कामोर्तब झालं. तर राष्ट्रवादी शरद पवार गटाकडूनही अडीच वर्षे विरोधी पक्षनेतेपदाची मागणी केली जात होती, अशी माहिती समोर आली. तसेच काँग्रेसकडूनही विधान परिषदेचं विरोधी पक्षनेतेपदाची मागणी केली जात असल्याची माहिती समोर आली. पण या सर्व चर्चांचा दावा उद्धव ठाकरे यांनी खोडून काढला.गेले काही दिवस सातत्याने एक प्रश्न विचारला जात होता की, विरोधी पक्षनेतेपदाबाबत दावा सांगणार आहात की नाहीत? शिवसेनेने आज विरोधी पक्षनेतेपदाबाबत दावा केलेला आहे. साहजिकच आहे, काँग्रेस असो किंवा राष्ट्रवादी असो, महाविकास आघाडी म्हणून या पुढची वाटचाल आम्ही एकत्र करणार आहोत. इतर सुद्धा ज्या काही गोष्टी आहेत त्याबद्दलही चर्चा सुरु आहे. यापुढे सुद्धा चर्चा करु. आम्ही एकत्रितपणे याबद्दल निर्णय घेत राहू. पण आज मात्र विधानसभा अध्यक्षांकडे विधानसभेतल्या विरोधी पक्षनेतेपदासाठी आम्ही भास्करराव जाधव यांच्या नावाची मागणी केली आहे, असं उद्धव ठाकरे यांनी सांगितलं.आम्हाला खात्री आहे की, लोकशाही मुल्यांचं पालन करुन लवकरात लवकर याबाबत निर्णय होईल आणि येत्या बजेटपूर्वी, कारण बजेटमध्ये विरोधी पक्षनेता असायला पाहिजे, जो जनतेच्यावतीने काही बोलू शकेल. आम्ही अपेक्षा अशी करतोय, मुख्यमंत्री ज्याप्रमाणे स्वच्छ कारभार करत आहेत. त्यांनी काल सांगितलं की, केंद्रीय मंत्र्यांच्या मुलीची काल छेड काढली गेली. स्वत: मुख्यमंत्री बोलले की, कोणत्याही पक्षाचा असला तरी त्याला दया, क्षमा दाखवली जाणार नाही. त्याचपद्धतीने याबाबतही निर्णय होईल, असं मला वाटतं, असं उद्धव ठाकरे म्हणाले.विरोधी पक्षनेतेपदाबाबत अडीच-अडीच वर्षे असा काही फॉर्म्युला नाही. आम्ही एकत्रितपणे पुढे जात आहोत. बऱ्याच गोष्टी आहेत, निवडणुका असतील किंवा काही असतील तर पुढे बघू, अशी प्रतिक्रिया उद्धव ठाकरे यांनी दिली. भाजपला विरोधी पक्षनेतेपदासाठी आदित्य ठाकरे यांचं नाव चालणार होतं हे मला आधी कळलं असतं तर बरं झालं असतं, म्हणजे घराणेशाहीला त्यांचा विरोध नाही हे मला कळलं असतं तर बरं झालं असतं, असा टोला देखील उद्धव ठाकरेंनी भाजपला लगावला.

# तर तुमची हकालपट्टी करावी लागेल! सीएमचा मुंडेंना इशारा; राजीनाम्याची इनसाईड स्टोरी

**मुंबई:** बीडमधील सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येचं प्रकरण गेल्या ३ महिन्यांपासून राज्यभरात तापलेलं आहे. या प्रकरणात राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते धनंजय मुंडे यांचा निकटवर्तीय वाल्मिक कराडला अटक झाली. त्याच्यावर मकोका लावण्यात आला. या प्रकरणाच्या तपासावर परिणाम होऊ नये म्हणून मुंडे यांच्या राजीनाम्याची मागणी गेल्या २ दिवसांपासून सुरु होती. अखेर आज त्यांनी राजीनामा दिला. देशमुख यांच्या निर्घृण हत्येचे काही फोटो काल रात्री समोर आले. ते पाहून संपूर्ण महाराष्ट्र हादरला. अखेर आज सकाळी मुंडेंनी राजीनामा दिला. या राजीनाम्याचा घटनाक्रम आता समोर आला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे प्रारंभीपासून धनंजय मुंडे यांनी राजीनामा द्यावा, यासाठी आग्रही होते. यापूर्वी त्यांनी ३ ते ४ वेळा अजित पवारांशी चर्चा केली होती. स्वत: धनंजय मुंडे यांनाही समजावून सांगितलं होतं. पण, धनंजय मुंडे ऐकायला तयार नव्हते. शेवटी एका क्षणी देवेंद्र फडणवीस यांनी अशी भूमिका घेतली की, जर तुम्ही राजीनामा देणार नसाल, तर मला राज्यपालांना पत्र लिहून तुम्हाला मंत्रिमंडळातून काढण्याची कारवाई करावी लागेल. थेट मुख्यमंत्र्यांनीच इशारा दिल्यानंतर वातावरण बदललं.काल रात्री देवगिरी बंगल्यावर राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्यांची बैठक झाली. त्या बैठकीला मुख्यमंत्री फडणवीसही गेले होते. उद्याच राजीनामा द्या, असा आदेशच या बैठकीत मुख्यमंत्र्यांनी मुंडेंना दिला. त्यानंतर आज सकाळी मुंडेंचा राजीनामा मुख्यमंत्र्यांच्या हाती आला. प्रारंभीपासूनच या प्रकरणात मुख्यमंत्र्यांनी अतिशय कडक आणि ठोस भूमिका घेतली होती, अशी सूत्रांची माहिती आहे. धनंजय मुंडेंच्या राजीनाम्यावर अजित पवारांनी भूमिका स्पष्ट करावी, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस माध्यमांशी संवाद साधताना म्हणाले होते.बीडच्या केज तालुक्यातील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांची ९ डिसेंबरला निर्घृण हत्या झाली. अपहरण करुन त्यांचे हाल हाल करण्यात आले. लोखंडी पाईप, क्लच वायरनं त्यांना बेदम मारलं गेलं. सुदर्शन घुले आणि त्याच्या साथीदारांनी देशमुख यांचा निर्दयीपणे जीव घेतला. या टोळीनं केलेली मारहाण इतकी भीषण होती की देशमुख यांचं दीड लीटर रक्त साकळलं. आवादा कंपनीच्या पवनचक्की प्रकल्पासाठी कराड आणि त्याच्या टोळीनं खंडणी मागितली होती. पण कंपनीच्या कर्मचाऱ्यांनी त्यास विरोध केला. त्यातून देशमुख यांच्या हत्येचा प्रकार घडला. या संपूर्ण प्रकरणात कराड क्रमांक एकचा आरोप आहे. तो मुंडे यांच्या अत्यंत जवळचा आहे. त्यामुळे मुंडेंनी नैतिकता म्हणून राजीनामा देण्याची मागणी केली जात होती.

दैनिक जनसंचालन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# सोहळ्यात मी नाहले




आमच्या घराशेजारच्यांनी मला बोलावल्याचा निरोप आला. म्हणून मी गेले त्यांच्या वरच्या हॉलमध्ये मला त्या घेऊन गेल्या आणि मला काही बोलताच येईना, तुम्ही जरा जाऊन हॉल उघडा, मी सामान घेऊन येते म्हटल्याने मी कडी काढली आणि थक्कच झाले.

माझा मुलगा सून, नातू, भावंडे असे सगळे जवळचे नातलग आत होते. हॉल पूर्ण सजवला होता. समोरच्याच भिंतीवर माझ नाव आणि फुलांनी ६१चा अंक तयार केला होता. सारं मला सुखद धक्का देणार आणि सर्वांच्या चेह-यावरचा आनंद सारं काही मला मी स्वप्नात नाहीना, असं विचार करायला लावणारं होतं. मी खरंच खूप भारावून गेले. सर्वकष आनंदाचा हा माझ्या आयुष्यातील पहिलाच भारावलेला प्रसंग.

मी प्रवेश करताच सर्वांनी टाळ्या वाजवल्या आपली आश्चर्याचा धक्का देण्याची कल्पना पार पडली. याचा आनंद माझ्या माणसांना झालेला तर सर्व जाणिवा गोठून गेलेली मी. मी आले तोवर माझ्या पाठोपाठ सर्वांमध्ये सामील असूनही घरातून मी येईपर्यंत निर्विकार राहिलेले माझे पती आले. सर्वांनी माझं औक्षण केलं सारे काही आनंदाचे सोहळे पार पडले.

माझा साठ वर्षांचा जीवनप्रवास हे सर्व आज आठवताना क्षणक्षण आठवतो आहे. एका खेडेगावात माझा जन्म अत्यंत गरीब घरात झाला. माझ्या आत्याला मूल नव्हतं. ती मला मी खूप बाळ असताना घेऊन गेली. मला तीच माझी आई माहीत झालेली. त्यामुळे ती माझी आई अशीच बाकीची नाती होत गेली. मी माध्यमिक शाळेत जाण्याच्या सुमारास माझी आई गेली. तोपर्यंत मला एक भाऊ झाला होता, तो खूप लहान होता. वडिलांची अत्यंत दुर्गम ठिकाणी शिक्षकाची नोकरी होती, त्याठिकाणी ते आम्हाला दोघांना घेऊन राहू शकत नव्हते आणि आम्ही दोघांनी राहण्याचा तो काळ आणि तशी परिस्थिती नसल्याने आम्हाला एका मावशीकडे रहावं लागलं. मी एसएससीची परीक्षा दिली आणि माझं लग्न झालं. मी मोठ्या शहरात राहायला आले. शहर मोठं आणि ज्या घरात आले तेही कुटुंब मोठं, त्यामुळे ठिकाण आणि घर तेथील माणसं सा-यांनीच मी भांबावले होते. परिस्थितीने आणि आलेल्या प्रसंगातून मी तोंड बंद ठेवून कसं राहायचं शिकले होते. पडेल किंवा कोणी सांगेल ते मी काम करत राहिले. व्यवहार, चाली-रीती सर्व काही शिकण्याचं आणि घरातील माणसांची मर्जी सांभाळणे हा माझा अभ्यासक्रम खूप वर्ष राहिला. मला आता कधी मागे वळून आयुष्याकडे पाहताना आणि आत्ताच्या मुलामुलींचे संसार पाहताना मनात येतं, माझं लग्न लवकर झालं आणि मला माझी अशी स्वत:ची मतं काहीच पुसटशीसुद्धा नसल्याने, मी त्या-त्या वेळी कोणी सांगेल ते शिकत गेल्याने आयुष्य शिकले. घरकामाबरोबर उरलेल्या वेळात काम म्हणून आणि संसाराला हातभार म्हणून मी भरतकाम करून देण्याचा पर्याय निवडला आणि कामाला लागले. पोस्टाची आरडी जमा करण्याचं काम स्वीकारलं. माझ्यासाठी मी दुचाकी शिकून घेतली. या सगळ्यासाठी मला माझ्या पतीने मोलाची साथ दिली आणि त्यामुळेच मला माझं जीवन घडवता आलं. नाहीतर मी शिक्षण, आर्थिक, सामाजिक सर्वच बाबतीत मागास होते. माझ्या लग्नानंतर मी माझ्या भावाला, वडिलांना माझ्या नवीन कुटुंबात सामावून घेऊ शकले. माझ्या सर्व एकत्रित असलेल्या कुटुंबाची मी कायम मनातून ऋणी राहिले. जे काम करायचं ते मनापासून, श्रमाने आणि निरपेक्षपणे या भावनांचं माझ्या आयुष्यात भांडवल खूपच फायदेशीर राहील. मला दोन मुलगे झाले. आता मी स्वतंत्र संसार सुरू केला. आत्तापर्यंत आमचं म्हणून एक घरकुल तयार झालं होतं. मुलगेही छान शिकले आणि आर्थिकदृष्ट्या रांगेला लागले. मोठा मुलगा परदेशी गेला आता तो सहकुटुंब तेथे राहतो. त्याने घरात मात्र संपर्क अजिबात कमी केला नाही. दोनही सुना माझ्या मुली म्हणून राहतात. माझ्या मोठ्या सुनेला अत्यंत गरज असल्याने, काही कारणांनी मला ऑस्ट्रेलियाला एकटीने जावं लागलं आणि मनात भीती ठेवून का असेना, तिची गरज म्हणून मी तिथे जाऊन पोहोचले सुद्धा. मला आता कधीच एकटेपणा जाणवत नाही, लहानपणापासून मी एकटी असणारी आता माझं कुटुंब माझ्यासकट नऊजणांच झालं आहे. माझ्यासाठी ते नवरसांच परिपूर्ण रसात्मक आहे. हे पूर्णत्व मला लाभलं यातच मी खूश आहे.

मी शहरात राहिल्याने माझ्या नात्याने संबंधित जे नातेवाईक शिक्षण, नोकरी संदर्भात आले त्यांना या शहरात रुजण्यासाठी आवश्यक ती मदत करण्यासाठी माझ्या पूर्ण कुटुंबाने सहकार्य केलं. त्यामुळे इथे रुजलेल्या नातलगांना माझं घर आधारघर राहील. देवाच्या दयेने आणि घरातील सर्वांच्या परोपकारी स्वभावाने मला कोणालाही आवश्यक ती मदत करता आली. अगदी कोणी माझ्या कोकणातून आरोग्याची दोरी बळकट करण्यासाठी उपचारासाठी हॉस्पिटलला आले असतील, तरीही त्यांच्यासाठी लागणारी सोय करणे हे प्रत्येकाने मुख्यत: माझ्या पतीने त्याची जबाबदारी स्वीकारून ते काम आपलसं केलं.

आज मला आर्थिक स्थिरता तर आली आहेच. माझ्या जन्माने मी कोणीच नसलेल्या आणि सुरुवातीची काही वर्ष खडतर गेलेल्या मला काहीच अपेक्षा आणि काहीच ध्येय न नेमून दिल्याने परमेश्वराने मला जे आज दिलं आहे, मी जी काही आज आहे तो माझा मला स्वर्ग वाटत आहे. आज माझ्या साठ वर्ष पूर्ण होणा-या आयुष्याकडून मला सर्व काही मिळालं आहे. नातं हे जन्मानं काय, यापेक्षा आपल्या जीवनात कसे जगतो, किती प्रेमाने जगतो, तशी नाती तयार होऊन ती आपल्याबरोबर जगतात. आपल्याला आनंद आजच्यासारखा देण्याला झटतात आणि कमकुवत वेळेला आधार द्यायला बरोबर असतात. हे जीवनातलं सत्य जगून पटलं आहे. मी आज माझ्या आयुष्याकडून माझ्या माणसांकडून पूर्ण समाधानी आहे. आज सर्वांनी माझ्या साजरा करत असलेल्या सोहळ्यात मी अक्षरशः न्हाऊन निघाले आहे.

# ऑस्ट्रियामध्ये स्पंज सिटी तयार होत आहे



जगभरातील शहरांनी हवामान बदलाचे धोके ओळखले आहेत आणि त्यांचा सामना करण्यासाठी उपाययोजनांवर काम करत आहेत. कारण बहुतांश शहरे हवामानाचा प्रकोप सहन करण्यासाठी तयार केलेली नाहीत. कॉंक्रीटपासून बनवलेल्या इमारती केवळ उष्णतेची लाट वाढवतात. याशिवाय पावसाचे पाणी जमिनीत मुरत नाही, अशा पद्धतीने या इमारती आणि शहरे बांधण्यात आली आहेत.या चुकीचा परिणाम म्हणून गेल्या काही महिन्यांत युरोपातील काही देशांना विनाशकारी वादळे आणि पुराचा सामना करावा लागला आहे.अशा आपत्ती टाळण्यासाठी ऑस्ट्रियामध्ये असे शहर तयार केले जात आहे, जे महापूआणि हवामानाची तीव्रता सहन करण्यास सक्षम असेल. व्हिएन्नाच्या शेजारी असलेल्या ॲमसीबोजेनमध्ये बनवलेल्या या स्पंज सिटीफ्तील झाडं पाहून वाटतं की ती एखाद्या योद्ध्यासारखी शहरे जमिनीत सतत पाणी वाहत राहण्यासाठी गुरुत्वाकर्षणाच्या श्नतीचा वापर करतील.

जेणेकरून हे पाणी तलावात साठवता येईल.सोप्या भाषेत सांगायचे तर, ही स्पंज शहरे ही नैसर्गिक जलचक्राची प्रतिकृती बनवतील.

ऑस्ट्रेलियाच्या युनिव्हर्सिटी ऑफ ॲडलेड लँडस्केप आर्किटेक्चर अँड अर्बन डिझाईन प्रोग्रामचे संचालक स्कॉट हॉकेन याबाबत म्हणतात की, ही संकल्पना पाण्याशी हुशारीने काम करण्याची आहे, जेणेकरून पूर कमी धोकादायक होईल. गेल्या दशकभरात स्पंज सिटीचे अनेक घटक जगभरातील मेट्रो शहरांमध्ये समाविष्ट केले गेले आहेत. चीनने २०१३ मध्ये कोंजियन यांची कल्पना स्वीकारली. तेथे ३० शहरांमध्ये या संकल्पनेची चाचणी करण्यात यश आले आहे. त्यामुळे सन २०३० पर्यंत ८० टक्के शहरी भाग या चौकटीत साचेबद्ध करण्याचे नियोजन आहे. कोपनहेगन येथील वेस्टरब्रोच्या एका उद्यानात पृष्ठभागाच्या खाली तलावांमध्ये मोठ्या प्रमाणावर पावसाचे पाणी साठवले गेले आहे.

# खासगी शाळांचा अतिरेक

शाळा हे अध्ययनाचे ठिकाण. गुरुविणा विद्या नाही, असे म्हटले ते खरे आहे आणि आपण घरी कितीही शिकविले आणि खासगी क्लासेस घेतले, तरी शाळा हे मुलांच्या भवितव्यासाठीचे एक दालन आहे. एक ज्ञानमंदिर आहे. पण, याच ज्ञानमंदिरांमध्ये आता बेजाबदारपणा आणि शिक्षणापेक्षा आर्थिक व्यवहाराचे ठिकाण झालेले दिसते. पूर्वीच्या शिक्षणाच्या पद्धती बदलल्या आणि सारेच बदलले. महानगरपालिका आणि जि. प. च्या शाळांमधली पटसंख्या घसरली आणि यातच खासगी शाळांचे पेव आले. मनमानीपणा वाढला. विविध विषयांच्या पदव्यांसाठीचे डोनेशन, फी यासाठी वारेमाप पैशाची मागणी होऊ लागली.

खासगी शाळांवर शिक्षण विभागाचा वचक राहिलेला नाही. नुकतेच पुणे येथील एमआयटी शाळेचे प्रकरण आपण पाहतोय. मुलांनी, मुलींनी काय घालावे, काय नको हे शाळा ठरवणार? ड्रेसकोड असावा, शिस्त असावी, नियम, अटी असाव्यात, पण आपण तालिबानमध्ये राहतोय, असे नको ते जाचक आणि लांच्छनास्पद नियम? शिक्षण विभाग फक्त चौकशी करणार, अहवाल येणार.. मग ठरवणार. शाळांचा मनमानी कारभार मुलांनी, पालकांनी का सहन करावा? डोनेशनच्या नावाखाली अनेक शाळा मोठे आर्थिक व्यवहार करतात. फी वरही नियंत्रण नसते. ठरलेल्या ठिकाणाहून वह्या, पुस्तके, कपडे घ्यायचे. हे सारे पालकांच्या फायद्यासाठी असले तरी, त्याला दुप्पट रक्कम मोजावी लागते. मुळातच शाळा या खासगीकरणाने व्यापल्यामुळे शिक्षणाचा दर्जा घसरलाय. शिक्षक आणि मुले यांच्यातले अंतर कमी झालेय. आदर्श शिक्षक ग्रामीण भागात दिसतात, पण शहरी भागात कशाचा कशाला ताळमेळच नाही. आपण शिकवलेलं मुलांना समजतंय की, नाही हे पाहण्याचा दृष्टिकोन आता संपलाय. पालकांनी शिक्षकांशी बोलायचे, तर तेही ठरलेल्या दिवसात.

शिक्षण झपाट्याने बदलतेय. व्यवसायिक शिक्षण, माहिती तंत्रज्ञान याआधारेच आता शिक्षण आहे, मात्र मुलांच्या बुद्धिमत्तेचा विचारही व्हायला हवा. शाळा प्रशासनाने शिक्षण नेमणूक करताना, मुलांच्या योग्यतेचा विचार करून नियुक्ती केली पाहिजे. अनेक शाळांमध्ये दरवर्षी शिक्षक बदलतात. एका शाळेतून अनुभव घेऊन दुस-या शाळेत जातात, कारण कमी पगारात नियुक्ती होते ते परवडत नाही. मग मुलांना शिक्षकांशी संवाद फार कमी होतो.

परीक्षा काळात मुलांना समजून सांगणे, समजावून घेणे फार महत्वाचे असते. मुलांशी आपुलकीने प्रेमाने वागले, तर मुलांनाही शिक्षणाची आवड निर्माण होते. आज अनेक उच्चशिक्षित पदवी घेऊन बाहेर पडताहेत, पण नोकरीचा यक्ष प्रश्न निर्माण झालाय. विविध पदव्या घेतलेले सुशिक्षित मिळेल ती नोकरी करण्यास तयार आहेत. मेडिकल सारख्या ॲडमिशनसाठी लाखो रुपये भरून पुढे काय, हा प्रश्न तर उरतोच. सांगायचा मुद्दा हा की, खासगी शाळांवर सरकारचा अंकुश असणे फार गरजेचे आहे. त्यांची फी, नियम, यावर नियंत्रण नसेल, तर काळाच्या ओघात शिक्षणाचा बाजार मांडला जाईल आणि पदव्या विकत घ्याव्या लागतील, ही परिस्थिती निर्माण व्हायला वेळ लागणार नाही.

# दहावीच्या परीक्षेत नापास होण्याची भीती, विद्यार्थ्यानं जीवन संपवलं, नागपुरात दुर्दैवी घटना...

**नागपूर :** दहावीच्या परीक्षेतील अपयशाच्या भीतीने एका विद्यार्थ्याने विष प्राशन करून आत्महत्या केल्याची दुर्दैवी घटना नागपूर जिल्ह्यातील कुही बसस्थानकावर घडली. गेले अनेक दिवस हा विद्यार्थी परीक्षेच्या ताणाखाली होता. मिळालेल्या माहितीनुसार, हा विद्यार्थी कुही शहरातील एका नामांकित शाळेचा विद्यार्थी होता. मार्च २०२४ मध्ये झालेल्या दहावीच्या परीक्षेत तो नापास झाला होता. शासनाच्या ॾएटीकेटीफ नियमानुसार त्याने अकरावीत प्रवेश घेतला होता, मात्र त्यासाठी पूरक परीक्षेत अपयश आलेले विषय पास करणे आवश्यक होते. सप्टेंबर २०२४ मध्ये झालेल्या पूरक परीक्षेसाठी त्याने तयारी केली होती, मात्र परीक्षेच्या दिवशी झालेल्या मुसळधार पावसामुळे तालुक्यातील रस्ते बंद पडले. त्यामुळे तो परीक्षा केंद्रावर पोहोचू शकला नाही, आणि त्याचा तो प्रयत्न अयशस्वी ठरला. पुन्हा नापास झाल्याने तो नैराश्यात गेला होता. आता त्याच्याकडे फक्त शेवटची संधी होती, ज्यामध्ये त्याला दोन्ही विषय उत्तीर्ण करावे लागणार होते. त्यामुळे गेल्या काही दिवसांपासून तो प्रचंड मेहनत घेत होता. मात्र, इंग्रजी विषयाची भीती मनात घर करून बसली होती. परीक्षेत अपयश येईल या भीतीने तो प्रचंड तणावात होता.शनिवारी इंग्रजीचा पेपर असल्याने मानसिक तणावाखाली असलेल्या विद्यार्थ्याने विष प्राशन केले. त्यानंतर तो कुही बसस्थानकावरच बेशुद्ध पडला. त्याच्या मित्राने ही बाब लक्षात घेऊन तातडीने त्याच्या वडिलांना कळवले. विद्यार्थ्याला लगेचच कुही येथील ग्रामीण रुग्णालयात हलवण्यात आले, मात्र प्रकृती चिंताजनक असल्याने त्याला नागपूर मेडिकल रुग्णालयात नेण्यात आले. मात्र, तिथे उपचार सुरू असतानाच त्याचा मृत्यू झाला.

या घटनेने संपूर्ण परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. परीक्षेच्या तणावामुळे विद्यार्थ्यांनी नैराश्यात जाऊ नये, यासाठी पालक आणि शिक्षकांनी त्यांच्याशी संवाद साधला पाहिजे, त्यांच्या मनातील परीक्षेच्या अपयशाची भिती दूर करण्याचा प्रयत्न केला पाहिजे असे तज्ज्ञांचे मत आहे. या प्रकरणी कुही पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद केली असून पुढील तपास सुरू आहे.

# मी रात्रभर झोपलो नाही, खूप घाबरलो होतो...पंजा काढल्यानंतर वरुण चक्रवर्तीचा धक्कादायक खुलासा....

**दुबई:** भारतविरुद्ध न्यूझीलंड हा ग्रुप स्टेजमधील शेवटचा सामना काल रंगला. हा शेवटचा सामना दुबई आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियमवर रंगला ज्यात भारताने ४४ धावांनी विजय मिळवला. न्यूझीलंडने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला तर भारताने प्रथम फलंदाजी केली. भारताने प्रथम फलंदाजी करत २४९ धावांचा डोंगर उभारला तर न्यूझीलंड केवल २०५ धावांवरच गारद झाला. भारताच्या विजयात गोलंदाज वरुण चक्रवर्तीने मोठी भूमिका बजावली त्याने पाच विकेट काढल्या. सामन्यानंतर वरुणने पंजाबद्दल आपले मत मांडले. भारतासाठी फक्त दुसरा एकदिवसीय सामना आणि चॅम्पियन्स ट्रॉफीमधील पहिला सामना खेळत असलेल्या या लेग स्पिनरने पंजा मारून अनेक मोठे विक्रम रचले. अर्थात, त्याच्या सामना जिंकणाऱ्या कामगिरीनंतर, सामनावीर पुरस्कारासाठी त्याच्यासमोर कोणतेही आव्हान नव्हते. पुरस्कार सोहळ्यात मनापासून बोलताना वरुण म्हणाला की, तो सामन्यादरम्यान खूप घाबरला होता, त्याला सामन्याच्या आदल्या रात्रीच कळले की तो न्यूझीलंडविरुद्ध सामना खेळणार आहे मी रात्रभर झोपलो नाही.वरुण म्हणाला, सुरुवातीला मी खूप घाबरलो होतो. कारण मी भारतासाठी जास्त एकदिवसीय सामने खेळलो नाही, पण जसजसा सामना पुढे सरकत गेला तसतसे मला बरे वाटले. विराट, रोहित, श्रेयस आणि हार्दिक माझ्याशी नियमितपणे बोलत होते आणि यामुळे मला खूप मदत झाली. मला सामन्याच्या पहिल्या रात्रीच हे कळले.

अर्थात मी देशासाठी खेळण्याची अपेक्षा करत होतो, पण मी खूप घाबरलो होतो. दुबई इंटरनॅशनल स्टेडियमची ही खेळपट्टी



फारशी वळण देणारी नव्हती. पण जर तुम्ही येथे चेंडू योग्य ठिकाणी टाकला तर ते मदत करते.

आणि माझ्यासोबतही असेच घडले, कारकिर्दीतील दुसऱ्या एकदिवसीय सामन्यात सामनावीराचा पुरस्कार जिंकणारा वरुण म्हणाला, कुलदीप, जड्डू आणि अक्षरने ज्या पद्धतीने गोलंदाजी केली, ती एक उत्तम सांघिक कामगिरी होती, ज्यामुळे आम्ही न्यूझीलंडला उत्तम पद्धतीने हरवू शकलो. भारत आता सेमी फायनलच्या शर्यतीत ऑस्ट्रेलियाविरुद्ध सामना खेळणार आहे.

# भाजपच्या आक्रमक राजकारणाला शह; दादांची ही रडारवर; शिंदेंकडून ११ जणांची यादी जाहीर

**मुंबई:** उपमुख्यमंत्री आणि शिवसेनेचे प्रमुख नेते असलेल्या एकनाथ शिंदेंनी भारतीय जनता पक्षाच्या आक्रमक राजकारणाला त्यांच्याच पद्धतीनं उत्तर दिल्याची चर्चा आहे. जानेवारीमध्ये पालकमंत्र्यांची घोषणा झाली. त्यानंतर फेब्रुवारीच्या पहिल्या आठवड्यात भाजपनं संपर्क मंत्र्यांची यादी जाहीर केली. सेना, राष्ट्रवादीचे पालकमंत्री असलेल्या जिल्ह्यांसाठीच भाजपनं संपर्क मंत्री जाहीर केले. भाजप मित्रपक्षांवर कुरघोडी करुन जिल्ह्यांमध्ये आपली समांतर निर्माण करत असल्याची चर्चा त्यावेळी झाली. भाजपनं केलेल्या या खेळीला आता शिंदेंनी प्रत्युत्तर दिलं आहे. शिवसेनेच्या मध्यवर्ती कार्यालयाकडून संपर्क मंत्र्यांची यादी जाहीर करण्यात आली आहे. सेनेच्या ११ मंत्र्यांकडे एकूण २३ जिल्ह्यांची जबाबदारी देण्यात आलेली आहे. या २३ जिल्ह्यांमध्ये भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे पालकमंत्री आहेत. मंत्री उदय सामंत, संजय राठोड यांच्याकडे प्रत्येकी तीन जिल्ह्यांचं संपर्क मंत्रिपद आहे. तर ८ मंत्र्यांकडे प्रत्येकी २ जिल्हे देण्यात आले आहेत. योगेश कदम यांच्याकडे १ जिल्हा देण्यात आला आहे.भाजपनं ५ फेब्रुवारीला संपर्क मंत्र्यांची यादी जाहीर केली. त्या घोषणेला महिना होत असताना आता शिंदेंनी त्यांच्या मंत्र्यांकडे मित्रपक्षांचे पालकमंत्री असलेल्या जिल्ह्यांचं संपर्क मंत्रिपद दिलं आहे. त्यामुळे शिंदे भाजपला त्यांच्याच रणनीतीनं प्रत्युत्तर देत असल्याची चर्चा रंगू लागली आहे. उपमुख्यमंत्री अजित




पवार यांच्याकडे पुणे, बीडचं पालकमंत्रिपद आहे. शिंदेंनी पुण्याचं संपर्क मंत्रिपद उदय सामंत यांच्याकडे, तर बीडचं संपर्क मंत्रिपद संजय शिरसाट यांच्याकडे दिलं आहे.

# २४ वर्षाच्या पोराने नवी मुंबईतील ५४ वर्षाच्या बिझनेसमनला ३३ लाखांना लुबाडलं...

**मुंबई :** महिला असल्याचे भासवून नवी मुंबईतील घणसोली येथे राहणाऱ्या ५४ वर्षीय व्यवसायिकाला गंडा घातल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. डेटिंग ॲपद्वारे प्रेमाच्या जाळ्यात ओढून त्याच्याकडून तब्बल ३३ लाख ३७ हजार रुपये उकळण्यात आले. भामट्याला नवी मुंबई पोलिसांच्या सायबर पोलिसांनी देहराडून येथून अटक केली आहे. संजय कैलासचंद मिना (२४) असे या भामट्याचे नाव आहे. या उकळलेल्या पैशांतून त्याने महागडी कार विकत घेऊन वेगवेगळ्या राज्यांतील तरुणींवर पैसे उधळल्याचे तपासात आढळून आले आहे. पीडित व्यावसायिक घणसोली येथे राहण्यास आहे. मार्च २०२४ मध्ये या व्यावसायिकाने बंम्बल नावाच्या डेटिंग ॲपवर सर्च केले होते. त्यावेळी आरोपी संजय मिना या भामट्याने आपण प्रगती दहिया नावाची महिला असल्याचे भासवून ओळख केली. व्यावसायिकाशी मैत्री करत त्याच्याशी चॅटिंगद्वारे संवाद




वाढवला होता.त्यानंतर मिना याने प्रेमाचे नाटक करुन त्याला आपल्या प्रेमाच्या जाळ्यात ओढले होते. तसेच त्याने वेगवेगळी कौटुंबिक कारणे सांगून व्यावसायिकाकडून सहानुभूती मिळवित १० मार्च ते ३० जून या कालावधीत तब्बल ३३ लाख ३७ हजार रुपये उकळून त्याची फसवणूक केली होती.सुप्रसिद्ध अभिनेता आयुषमान खुराना याची मुख्य भूमिका असलेल्या बहुचर्चित ड्रीमगर्ल या चित्रपटातील कथानकाप्रमाणे आरोपीने व्यावसायिकाला फसवले. ऑगस्ट महिन्यामध्ये या व्यावसायिकाने नवी मुंबईच्या सायबर पोलिस ठाण्यात जाऊन तक्रार दाखल केल्यानंतर वरिष्ठ पोलिस निरीक्षक गजानन कदम यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांनी या प्रकरणाच्या तपासाला सुरुवात केली होती. सायबर पोलिसांनी देहराडून येथे जाऊन संजयला ताब्यात घेतले.

# धनंजय मुंडेंवर ३०२ अंतर्गत गुन्हा दाखल करा! मनोज जरांगे आक्रमक...

**बीड :** मनोज जरांगे आज (४ फेब्रुवारी) बीडच्या मस्साजोगमध्ये धनंजय देशमुखयांच्या भेटीसाठी पोहोचले आहेत. मनोज जरांगे आणि धनंजय देशमुख यांच्या भेटीदरम्यान देशमुखांना आपल्या भावना अनावर झाल्या. दरम्यान, मनोज जरांगे यांनी अत्यंत तीव्र शब्दांत आपली नाराजी व्यक्त केली आहे. मंत्री धनंजय मुंडेंवर ३०२ अंतर्गत गुन्हा दाखल करण्याची मागणी त्यांनी सरकारकडे केली आहे. ही टोळी राज्यातून संपवावी लागेल. धनंजय मुंडेंना आमदारकीसकट मंत्रीपदावरुन उचलून फेका अशी मागणी यावेळी जरांगेंनी केली.बीडच्या मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांची अत्यंत निर्दयीपणे हत्या करण्यात आली होती. आरोपींनी क्रौऱ्याच्या सर्व सीमा ओलांडत या हत्येसंबंधीचे चित्रण देखील केले. संतोष देशमुख हत्या प्रकरणांमध्ये व्हॉट्सअप कॉल चा व्हिडिओ महत्त्वाचा पुरावा ठरला. फॉरेन्सिक कडून हा व्हिडिओ सीआयडीला मिळाल्यानंतर त्याचे छोटे छोटे दहा ते बारा व्हिडिओ तयार झाले आणि त्यातूनच या व्हिडिओमधील व्यक्ती आणि सीआयडीने या प्रकरणात ताब्यात



घेतलेली व्यक्ती यांची फॉरेन्सिक तपासणी झाली.

दरम्यान, या अमानुषतेचे फोटो समाजमाध्यमांवर प्रसारित झाल्यानंतर धनंजय देशमुखांनी एकच फोटो पाहून ते फोटो माध्यमांतून हटवण्याची विनंती केली. हे फोटो आधिच गृहमंत्रालयापर्यंत पोहोचले होते. सर्वांनी फोटो आधीच पाहिले आहेत. या प्रकरणात १५०-२०० लोक सहभागी आहेत. सरकारला सर्व माहित आहे. पण कोणाला वाचवण्याचा प्रयत्न होतोय हे महाराष्ट्राच्या जनतेला माहित आहे. मारेकऱ्यांना नियती माफ करणार नाही. असे धनंजय देशमुख म्हणाले. समाजमाध्यमांवर संतोष देशमुख यांच्या हत्येचे फोटो प्रसारित झाल्यानंतर मनोज जरांगे धनंजय देशमुखांच्या भेटीला पोहोचले. देशमुखांचे सांत्वन करत जरांगेंनी धनंजय मुंडेंवर ३०२ अंतर्गत गुन्हा दाखल करण्याची मागणी त्यांनी सरकारकडे केली आहे. ही टोळी राज्यातून संपवावी लागेल. धनंजय मुंडेंना आमदारकीसकट मंत्रीपदावरुन उचलून फेका अशी मागणीही यावेळी जरांगेंनी केली.

काल (३फेब्रुवारी) देवगीरी बंगल्यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यात झालेल्या बैठकीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस धनंजय मुंडेंचा राजीनामा घेणार असल्याच्या बातमीवर शिक्कामोर्तब झाले आहे.

# महाबोधी महाविहाराच्या मुक्तीसाठी एकवटले बौद्ध बांधव...

जनसंचलन/बुलढाणा

महाबोधी विहार १९४९ कायदा रद्द करून महाबोधी महाविहार हे संपूर्ण बौद्धांच्या ताब्यात द्यावे याकरिता महाबोधी महाविहार बोधगया येथे अनिश्चित कालीन आमरण उपोषणास बौद्ध भिक्षू बसले आहेत.त्यांच्या समर्थनात सोमवार दि.३ मार्च २०२५ रोजी सकाळी १० वाजता जिल्हाधिकारी कार्यालय समोर बुलढाणा येथे एक दिवशीय धरणे आंदोलनाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी बुलढाणा येथील समस्त बौद्ध उपासक तथा उपासिका यांच्यावतीने महामहीम राष्ट्रपती यांना जिल्हाधिकारी बुलढाणा यांच्यामार्फत निवेदन देण्यात आले. महाबोधी महाविहार बोधगया येथे राजकुमार सिद्धार्थला बोधी वृक्षाखाली ज्ञानाची प्राप्ती होऊन बुद्धत्व प्राप्त झाले. त्यामुळे हे स्थळ जागतिक बौद्धाचे पवित्र श्रद्धास्थान आहे. या विहाराची निर्मिती २६०० वर्षा पूर्वी सम्राट अशोक यांनी केली होती.जागतिक वारसा धरोहर म्हणून या महाविहाराची नोंद झालेली आहे. १९४९ मध्ये महाबोधी महाविहार अॅक्ट बनवण्यात आला. या कायद्यानुसार आजही हे विहार महंतांच्या ताब्यामध्ये आहे. या विहारावरती अधिकार हा




बौद्ध धर्मीयांचा असला पाहिजे परंतु या कायद्यांतर्गत वर्तमानात सुद्धा या विहारावर इतरांचा ताबा आहे. त्यामुळे या विहाराचे विद्रूपीकरण आणि विहार परिसरात अतिक्रमण मोठ्या प्रमाणात सुरू आहे. भारत देशात भारतीय संविधान लागू झाल्यानंतर १९५० पूर्वीचे सर्व कायदे रद्द होतात. राज्यघटनेत धर्म स्वतंत्र्याचा मूलभूत अधिकार कलम २५ ते २८ मध्ये दिला आहे. या अधिकारांतर्गत ज्या धर्माचे अनुकरण करणारे अनुयायी असतील त्याच धर्मातील लोकाना त्या पवित्र स्थळाचा अधिकार दिलेला आहे. १९४९ चा कायदा हा भारतीय संविधानाच्या मूलभूत अधिकाराची उल्लंघन करते म्हणून हा कायदा बदलून महाबोधी महाविहार कायदा नवीन बनवून महाबोधी महाविहाराचा संपूर्ण ताबा हा बौद्ध बांधवांना देण्यात यावा याकरिता या एक दिवसीय धरणे आंदोलनाचे आयोजन करण्यात आले होते. हे आंदोलन यशस्वी करण्यासाठी आंदोलनाचे मुख्य आयोजन कुणाल पैठणकर,रमेश घेवंदे एड.राहुल दाभाडे, आत्माराम चौथमोल,गणेश झोटे, पद्माकर डोंगरे, शाहीर इंगळे, बी.के.इंगळे, अमोल खरे, निलेश गायकवाड, श्रीधर जाधव, अनंता मिसाळ, प्रमोद दाभाडे, लताताई खिल्लारे, सुजाताताई हिवाळे, नीता दाभाडे, वर्षा कासारे, ज्योती आराख, लता पैठणकर, अस्मिता खंडेराव, वंदना इंगळे, सुनंदा झोटे, रूपालीताई भालेराव, नीरज ताई, भांबळे ताई, रेखा कांबळे बौद्ध उपासक व उपासिका या आंदोलनात मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जंगलात डिंक तस्कर आग लावत असल्याने सातपुडा पर्वतातील वनसंपदा नष्ट होण्याच्या मार्गावर.

जनसंचलन/ जळगाव जा



जळगाव जामोद तालुक्यातील सातपुडा पर्वत रांगांमध्ये पंधरा दिवसापासून सतत विविध ठिकाणी सालीच्या डिंक तस्कारांकडून जंगलामध्ये आग लावण्याचे प्रकार वाढीस लागले आहेत. या मानवनिर्मित वनव्यामुळे सततच्या वनव्याने सातपुडा पर्वतातील वनसंपदेचा ऱ्हास होत असुन या वणव्यांमुळे सातपुडा पर्वतातील लाखोंची वनसंपत्ती जळून खाक होत असून .वन्यप्राणी सुध्दा मोठ्या प्रमाणात भाजल्या जात असल्याचे वास्तव समोर आले आहे...सतत लावण्यात येत असलेल्या वणव्यांकडे वनकर्मचाऱ्यांसह वनअधिकाऱ्यांचे मात्र साफ दुर्लक्ष होत असल्याचे यावरून दिसून येते...जामोद राऊंडमधील वनजंगलात मोठ्या प्रमाणात सालयच्या डिकांची तस्करी सुरू असून सदर डिंकाला बऱ्यापैकी भाव असल्याने सातपुड्यातील आदीवासींकडून सालयचा डिंक जमा करून व्यापारी डिंक . तस्करांना अवैध मार्गाने खुलेआम विकण्याचा धंदा मोठ्या प्रमाणात सुरू आहे... या सालयच्या झाडाला जाळल्याने उष्णतेमुळे झाडाचा जास्त डिंक निघत असल्याने डिंक काढणांऱ्यांकडून सातपुड्याला आग लावण्यात येत असल्याचे सांगण्यात येत आहे.... तसेच आगीमुळे पर्वतातील हिंस्र प्राणीसुध्दा दूर निघून जातात. यामुळे जनावरांचा धोका राहत नाही आणि डिंक सुध्दा मोठ्या प्रमाणात निघतो. त्यामुळे सातपुड्याला वणवा न लागता लावण्यात येत असल्याचे बोलल्या जात आहे... जामोद राऊंडमधील वनजंगलात मोठ्या प्रमाणात वृक्षांची अवैध कत्तल जोमात सुरू असून मोठ्या प्रमाणात सातपुडा पर्वतात शेती काढून अतिक्रमण करण्यात येत आहे. अनेक दिवसांपासून खुलेआम सुरू असलेल्या सालयच्या डिंक तस्करीकडे वनपालांसह वनकर्मचाऱ्यांचे दुर्लक्ष होत असून कुणीच वनकर्मचारी जंगलात जातांना दिसून येत नाहीत. केवळ हप्ता वसूल करण्यासाठीच बुधवारी आठवडी बाजाराचे दिवशीच जामोद गावांत दिसून येतात. सद्याही २ ते ३ दिवसांपासून सोनबर्डी पासून जवळच असलेल्या साताशिवाच्या बेंडीलगत व इतरही सातपुडा पर्वतात लागत असलेल्या जोराच्या वनव्यांकडे वनअधिकाऱ्यासंह वनकर्मचाऱ्यांचे दुर्लक्ष होत आहे..याप्रकरणी वरिष्ठ अधिकाऱ्यांनी लक्ष देवून सातपुडा पर्वतास लागणाऱ्या वणव्यास तसेच डिंक तस्करीला आळा घालण्याची मागणी वृक्षप्रेमी जनतेकडून होत आहे.

# चिखली तालुक्यातील वळती गावांतून फार्मर आयडी योजनाचा शुभारंभ...

## शेतकऱ्यांनी योजनाचा लाभ घ्यावा



जनसंचलन/ जळगाव जा

शासकीय योजनांचा लाभ जलदगतीने पोहचविण्यासाठी केंद्र शासनाने शेतकऱ्यांसाठी आधार कार्डप्रमाणे स्वतंत्र डिजीटल ओळखपत्र देण्याचा निर्णय घेतला आहे. या योजनेचा शुभारंभ चिखली तालुक्यातील वळती गावापासून तहसीलदार संतोष काकडे यांच्या हस्ते करण्यात आला. तालुक्यातील सर्व शेतकऱ्यांनी डिजीटल फार्मर आयडी तयार करण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले. योजनेंतर्गत शेतकरी यांना विविध सरकारी योजनांचा लाभ घेण्यासाठी महसूल, कृषी व सीएससी केंद्रामार्फत शेतकरी व त्यांच्या शेताचे आधार सलंग्र माहिती संच तयार करण्याचे काम सुरु आहे. चिखली तहसीलदार संतोष काकडे यांनी चिखली तालुक्यातील ११ मंडळात अॅग्रीस्टकच्या शिबीराला उपस्थित राहून योजनेचे महत्व लोकांना विषद केले. तसेच फार्मर आयडी तयार करण्यासाठी ग्राम महसूल अधिकारी, कृषीसहायक व सीएससी केंद्रांना भेट देण्याचे आवाहन त्यांनी केले. ज्या सीएससी केंद्रावर फार्मर आयडी तयार करण्यास हयगय होत असल्याचे निर्देशात आल्यास अशा केंद्राची मान्यता रद्द करण्यात येईल, अशा सूचना श्री. काकडे यांनी दिल्या.



# डोणगावात एक्का बादशहा! खाकीची काही लाज?

## बुलडाणा शहरासह जिल्ह्यात अवैध धंदे जोमात पोलीस प्रशासन कोमात!

जनसंचलन/बुलढाणा

मेहकर तालुक्यातील डोणगावात खाकीची लाज बाळगणारे दिसून येत नसल्याचा आरोप होतोय. कारण पोलिसांच्या आशीर्वादाने सगळे अवैध धंदे तेजीत सुरु आहे. मटका, जुगार, अँपेरिक्षांची बेकायदा वाहतूक, सोरट, वाळूची चोरटी वाहतूक, आदी अवैध धंदे तेजीत सुरू असताना पोलिस अधिकारी झोपेचे सोंग घेत आहेत. अवैध धंद्यांवर कारवाईचा फास आवळण्यात महत्त्वाची भूमिका असलेली स्थानिक गुन्हे शाखा वसुलीच्या कामात गर्क असल्याचाही आरोप होतोय! ग्रामीण भागात व शहरात धूम स्टाइलने महिलांच्या गळ्यातील दागिने हिसकावणे, जबरी चोर्या व घरफोड्या हे गुन्हे नित्याचे झाले आहेत.या गुन्हेगारीला शहरातील जुगार मटका साथ देत असून हा धंदा जोरात सुरू आहे. संबंधितांवर कारवाई करण्याऐवजी त्यांना संरक्षण पुरवण्यात येत असल्याचा नागरिक आरोप करीत आहे. डोणगावात स्थानिक पोलिस व एलसीबी संगनमत करून खुलेआम मटका चालवतात. शहरात अनेक टपर्यांवर मटका सुरू आहे. कारवाईत सातत्य नसल्याने या टपर्या जोरात सुरू असून, अनेक जण कर्जबाजारी होऊन आत्महत्या करत आहेत. ठरावीक रक्कम दरमहा पोहोच केली जात असल्याने त्यांच्यावर कारवाई होत नाही. राजरोसपणे जुगार सुरू असताना पोलिस दुर्लक्ष करतात. एलसीबी पथकाने या अड्डय़ांवर कारवाई करण्याची गरज निर्माण झाली आहे.जिल्हा पोलीस अधीक्षक विश्व पानसरे यांनी याकडे लक्ष द्यावे अशी ही मागणी जिल्हाभरातून होत आहे.





आपल्या पाल्याच्या शिक्षणासाठी आजच बचत सुरु करा व त्याचे भविष्य सुरक्षित करा

बचत करा रु. ५०० प्रती माह पासून..



| अ.क्र. | गुंतवणूक रक्कम / गुंतवणूक कालावधी महिने | ५०० | १००० | १५०० | २००० | ३००० | ५००० |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | पाल्याच्या वयाच्या १८ वर्षानंतर मिळणारी रक्कम | | | | | |
| १ | १५६ | १०३४१८ | २०६८३६ | ३१०२५४ | ४१३६७२ | ६२०५०७ | १०३४१७९ |
| २ | १४४ | ९५५४४ | १९१०८८ | २८६६३३ | ३८२१७७ | ५७३२६५ | ९५५४४२ |
| ३ | १३२ | ८८२६९ | १७६५३८ | २६४८०६ | ३५३०७५ | ५२९६१३ | ८८२६८८ |
| ४ | १२० | ८१५४४ | १६३०८७ | २४४६३१ | ३२६१७५ | ४८९२६२ | ८१५४३६ |
| ५ | १०८ | ७५३३६ | १५०६७१ | २२६००७ | ३०१३४२ | ४५२०१३ | ७५३३५५ |
| ६ | ९६ | ६५५९६ | १३९१९३ | २०८७८९ | २७८३८६ | ४१७५७९ | ६९५९६५ |

ठेवींवरील आकर्षक व्याजदर

| अ.क्र. | मुदती ठेवीचे विवरण | | लागू व्याजदर | पतसंस्था व इतर संस्था |
|---|---|---|---|---|
| १ | १५ दिवस ते ९० दिवस | | ६.००% | ६.००% |
| २ | ९१ दिवस ते १८० दिवस (वैयक्तीक ठेवी करिता) | | ६.५०% | ५.००% |
| ३ | १८१ दिवस ते १३ महिने | | ६.००% | ६.००% |
| ४ | १४ महिन्याच्या वर २४ महिन्यापर्यंत (वैयक्तीक ठेवी करिता) | | ७.००% | ६.००% |
| ५ | आवर्त ठेव योजना २४ महिन्याकरिता रू. १५ लाखाचे वर (वैयक्तीक ठेवी करिता) | | ७.००% | ६.००% |
| ६ | मासिक ठेव | | ७.००% | - |
| ७ | बचत ठेव | अ) रू. ३ लाखांपर्यंत | ३.००% | - |
| | | ब) रू. ३ लाखांचे वर | ४.५०% | - |

ज्येष्ठ नागरिक, सैनिक, सैनिकांच्या विधवा पत्नी, दिव्यांग यांना ठेवींच्या व्याजदरावर १/२ टक्का जास्त व्याजदर लागू राहील.

5 लाख पर्यंतच्या ठेवींना DICGC चे संरक्षण कवच प्राप्त आहे

पुन्हा एकदा...

सुकन्या लक्षाधीश ठेव योजना



गुंतवणूकीचा कालावधी मुलीच्या वयाच्या १० वर्षापर्यंत

ग्राहकांच्या आग्रहाला मान देऊन बँक पुन्हा सुरू करीत आहे

सुकन्या लक्षाधीश ठेव योजना

जन्मापासून ते वय वर्ष १० पर्यंतच्या मुलींच्या भावी आयुष्यासाठी एकदाच या योजनेत गुंतवणूक करा व मुलीच्या २१ व्या वर्षी लक्षाधीश व्हा.

| वय | गुंतवणूक रक्कम | मिळणारी रक्कम |
|---|---|---|
| जन्माच्या वेळी | १७००० | १०३६०९ |
| १ वर्ष | १८००० | १००६५७ |
| २ वर्ष | १९५०० | १०००५२ |
| ३ वर्ष | २१५०० | १०१२१७ |
| ४ वर्ष | २३५०० | १०१५०९ |
| ५ वर्ष | २५५०० | १०१०६४ |
| ६ वर्ष | २७५०० | १००००३ |
| ७ वर्ष | ३०००० | १०००९७ |
| ८ वर्ष | ३३००० | १०१०२७ |
| ९ वर्ष | ३६००० | १०११२२ |
| १० वर्ष | ३९००० | १००५१५ |

आजच जवळच्या शाखेशी संपर्क करा

दि चिखली अर्बन को-ऑप. बँक लि. चिखली

मुख्यालय : डॉ. शामाप्रसाद मुखर्जी मार्ग, छत्रपती शिवाजी महाराज चौक, चिखली, जि. बुलडाणा

फोन : ०७२६४-२४२०३९, २४२९७९, २४२०३८ टोल फ्रि नंबर : १८००-३१३-२३२४


## देऊळगाव राजा तालुक्यातील अवसायनातील २९ संस्थांची नोंदणी रद्द होणार

## आक्षेप नोंदविण्याचे सहायक निबंधकाचे आवाहन

जनसंचलन/ देऊळगाव राजा

देऊळगाव राजा तालुक्यातील २९ सहकारी संस्थाची नोंदणी रद्द करण्याची कार्यवाही सहायक निबंधक सहकारी संस्थाव्दारे करण्यात येत आहे. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६१ चे नियम ८९(४) नुसार अवसायनातील संस्थाशी ज्या कोण्या व्यक्ती वा संस्थेविरुद्ध काही दावे असल्यास त्यांनी जाहिर सूचना प्रसिद्ध झाल्यचे तारखेपासून दोन महिन्याचे आत नोंदवावे लागणार आहे. त्यानंतर दाव्यांची दखल घेतली जाणार नाही, असे देऊळगाव राजा सहकारी संस्थाचे सहायक निबंधक एस.यु. जगदाळे यांनी कळविले आहे. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०२ नुसार सहकारी संस्था अंतिम अवसायनात घेण्यात अलेल्या अहेत. या संस्थावर अवसायकाची नियुक्ती यापुर्वीच करण्यात आलेली आहे. यापुढील दाखल केलेल्या दाव्याचे नुषंगाने कोणत्याही दावा दाखल न झाल्यास त्यांनतर २९ संस्थांची नोंदणी रद्द करण्यात येईल, यांची नोंद घ्यावी.


पत्रकारीतेचा धर्म आम्ही निभावणार




सिटी न्यूज टीव्ही & सोशल चॅनल

वेब साईड & पोर्टल चॅनल

वृत्त पेपर हार्ड कॉपी सह - ई पेपर

कुठली ही बातमी निशुल्क

***

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन

काही तक्रार असल्यास संपर्क

शिव शॉपिंग कॉम्प्लेक्स, कारंजा चौक बुलडाणा मो.9822720784,9373359040 पिन 443001